# SMT . RDG COLLEGE FOR WOMEN ,AKOLA

Department of Political Science

# Power point Presentation on Panchayat raj

Dr. Vinod B. Khaire
Head of the department
Dr Ashish Mutthe
Assistant Professor

# पंचायतराज व्यवस्था

- **ग्रामप्रशासन**
- भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचा जनक/पितामह म्हणून लॉर्ड रिपनला ओळखले जाते.
- लॉर्ड रिपनने भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेचा कायदा **12 मे 1882** रोजी केला.
- स्थानिक स्वराज्य संस्था स्विकारणारे पहिले राज्य-राजस्थान स्वीकार –**2 ऑक्टोंबर 1959**
- स्थानिक स्वराज्य संस्था स्विकारणारे दुसरे राज्य – आंध्रप्रदेश स्विकार –**1 नोव्हेंबर 1959**
- पंचायतराज स्विकारणारे नववे राज्य – महाराष्ट्र
- स्थानिक स्वराज्य संस्थेला पंडित नेहरू यांनी पंचायतराज हे नाम दिले.

# पंचायतराज व्यवस्था

- **बलवंतराय मेहता समिती**
- भारतामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेचे स्वरूप व कल्पना निश्चित करण्यासाठी सर्वात प्रथम बलवंतराय मेहता समिती नियुक्त करण्यात आली.
- या समितीची नियुक्ती केंद्र शासनाने **16 जानेवारी 1957** मध्ये केली. तर समितीने आपला अहवाल शासनास 1958 मध्ये सादर केला.
- या समितीमधील इतर सदस्य – ठाकुर फुलसिंग, डी.पी. सिंग, बी.जी. राव.

# पंचायतराज व्यवस्था

- **यासमितीने केलेल्या शिफारशी**
- लोकशाही विकेंद्रीकरण करण्यात यावे.
- पंचायतराज व्यवस्था त्रिस्तरीय असावी. म्हणजेच गाव पातळीवर ग्रामपंचायत, तालुका पातळीवर पंचायत समिती व जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद असावी.
- ज्या गावाची लोकसंख्या **500** असेल तेथे ग्रामपंचायत स्थापन करण्यात यावी.
- ग्रामपंचायतीच्या सदस्यांची निवड प्रत्यक्ष प्रौढ मतदान पद्धतीने व्हावी.
- ग्रामपंचायतीमध्ये महिलांना किमान दोन जागा राखीव असाव्यात. तसेच अनुसूचीत जाती-जमतीच्या लोकांना प्रत्येकी एक जागा राखीव असावी.
- जिल्हा परिषदेमध्ये पंचायत समितीचे अध्यक्ष तसेच जिल्ह्यातील खासदार व आमदार यांना सदस्यत्व असावे.
- जिल्हा परिषदेचा अध्यक्ष हा जिल्हाधिकारी असावा.

# पंचायतराज व्यवस्था

- अशोक महेता समिती नियुक्ती - **1977**. शासनास अहवाल सादर - **1978.**
- **महत्वाच्या शिफारशी**
- पंचायत संस्थांच्या माध्यमातून लोकशाहीचे विकेंद्रीकरण करण्यासाठी जनतेच्या सहभागास महत्व दिले गेले पाहिजे.
- पंचायत संस्थाच्या निवडणुका वेळेवर घेणे बंधनकारक करावे.
- जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाची निवड प्रत्यक्ष मतदारामधून करण्यात यावी.
- पंचायत पद्धती व्दिस्तरीय असावी.

# पंचायतराज व्यवस्था

- **73 वी घटना दुरूस्ती**
- भारतातील पंचायतराज संस्थांना 73 व्या घटनादुरुस्तीमुळे घटनात्मक दर्जा (संविधानिक दर्जा) प्राप्त झाला.
- ही घटनादुरूस्ती **24 एप्रिल 1993** रोजी करण्यात आली.
- 73 व्या घटनादुरूस्तीनुसार करण्यात आलेल्या महत्वाच्या तरतुदी
- प्रत्येक गावामध्ये सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांचा समावेश असणारी ग्रामसभा व ग्रामपंचायत असणे बंधनकारक करण्यात आले.
- भारतातील सर्व राज्यामध्ये त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था स्थापन करण्यात यावी.
- पंचायत व्यवस्थेच्या तिन्ही स्तरामध्ये महिलांसाठी 1/3 जागा राखीव ठेवण्याचे बंधनकारक करण्यात आले.

# पंचायतराज व्यवस्था

- देशातील प्रत्येक राज्यात पंचायतराज संस्थांचा कार्यकाल 5 वर्ष करण्यात आला.
- पंचयातराजच्या तिन्ही स्तरामध्ये महिला आणि अनुसूचीत जाती-जमातीसाठी पदाधिकाऱ्यांची पदे राखीव ठेवण्याची तरतूद करण्यात आली.
- पंचायतराज संस्थासाठी प्रत्येक राज्यामध्ये स्वतंत्र निवडणूक यंत्रणा स्थापना करण्याचे बंधन घालण्यात आले.
- केंद्रीय वित्त आयोगाच्या धर्तीवर प्रत्येक राज्याने राज्य वित्त आयोगाची स्थापना करणे आवश्यक करण्यात आले.

# पंचायतराज व्यवस्था

- **महाराष्ट्र शासनाने पंचायतराज संस्थांसंबंधी नियुक्त केलेल्या समित्या वसंतराव नाईक समिती**
- नियुक्ती – **1960**
- शासनाला अहवाल सादर – **15 मार्च 1961**
- शासनाने अहवाल स्वीकारला – **1 एप्रिल 1961**
- शिफारशीची अंमलबजावणी – **1 मे 1962**
- महाराष्ट्रातील पंचायतराज व्यवस्था नाईक समितीच्या शिफारशीवर आधारित आहे.
- महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम – 1961 हा कायदा नाईक समितीच्या शिफारशीवरून करण्यात आला.
- महाराष्ट्रातील पंचायतराज व्यवस्था त्रिस्तरीय असावी अशी शिफारस नाईक समितीने केली.

# पंचायतराज व्यवस्था

- **ल.ना. बोंगिरवार समिती**
- नियुक्ती – **एप्रिल 1970**
- शासनाला अहवाल सादर – **सप्टेंबर 1971**
- प्रत्येक वर्षी ग्रामसभेच्या किमान दोन बैठका व्हाव्यात अशी शिफारस या समितीने केली.
- **बाबूराव काळे समिती**
- नियुक्ती – **ऑक्टो 1980**
- शासनास अहवाल सादर – **1981**
- जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्यात यावी अशी शिफारस या समितीने केली.

# पंचायतराज व्यवस्था

- **पी.बी. पाटील समिती**
- नियुक्ती – **जून 1984**
- शासनास अहवाल सादर – **1986**
- **शियफरशी**
- ग्रामपंचायतीची लोकसंख्येनुसार पुनर्रचना करण्यात यावी.
- जिल्हा परिषदांवर खासदार व आमदार यांना सदस्यत्व असू नये.
- आर्थिक विकेंद्रीकरण ग्रामपंचायतीकडे वर्ग करण्यात यावा.
- ग्रामपंचायतीच्या वार्षिक अनुदानामध्ये वाढ करण्यात यावी.
- सदस्यांची निवड प्रत्यक्ष मतदारामधून करण्यात यावी.

# पंचायतराज व्यवस्था

- **स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक खर्च मर्यादा**
- स्थानिक स्वराज्य संस्थाचे नाव – खर्च रुपये
- महानगरपालिका – 1,00,000 रु.
- जिल्हा परिषद – 60,000 रु.
- नगरपरिषद – 45,000 रु.
- पंचयात समिती – 40,000 रु.
- ग्रामपंचायत -7,500 रु.

# पंचायतराज व्यवस्था

- स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात ग्रामीण विकासाचे विविध कार्यक्रम राबवण्यास शासनाने सुरुवात केली. बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीनुसार देशात ‘त्रिस्तरीय पंचायत राज’ व्यवस्था निर्माण करण्यात आली. भारतीय राज्य संघाच्या राज्य मार्गदर्शक तत्त्वाच्या कलम ४०नुसार प्रत्येक राज्याने स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीनुसार १ मे १९५९ला प्रथम राजस्थान राज्याने पंचायत राज व्यवस्था स्वीकारली.

# पंचायतराज व्यवस्था



# पंचायतराज व्यवस्था



# पंचायतराज व्यवस्था



# पंचायतराज व्यवस्था



# पंचायतराज व्यवस्था



# पंचायतराज व्यवस्था

- **ग्रामसभा**
- ग्रामसभेत संबंधित खेड्यातील सर्व प्रौढ **(18 वर्षे वयावरील)** स्त्री-पुरुष नागरिकांचा/मतदारांचा समावेश होतो.
- ग्रामसभेच्या वर्षातून किमान चार बैठका व्हाव्यात अशी सूचना केंद्रसरकारने अलिकडेच सर्व राज्यांना केली आहे. त्या बैठका पुढील वेळी व्हाव्यात.
- –**26 जानेवारी (प्रजासत्ताक दिन), 15 ऑगस्ट (स्वातंत्र्यदिन), 1 मे (महाराष्ट्र दिन), 2 ऑक्टोबर (गांधी जयंती)** आणि दोन बैठका स्त्रियांच्या व्हाव्यात.
- ग्रामसभा बोलविण्यासाठी 7 दिवस अगोदर नोटिस द्यावी लागते.
- ग्रामसभा बोलविण्याचा अधिकार सरपंचला असतो. सरपंच गैरहजर असल्यास उपसरपंच बैठक बोलविलो.
- ग्रामसभेच्या बैठकीचे अध्यक्षस्थान सरपंच भूषवितो. सरपंचाच्या गैरहजेरीत उपसरपंच अध्यक्षस्थान भूषवितो.

# पंचायतराज व्यवस्था

- **ग्रामपंचायत**
- भारतीय घटनेच्या कलम 40 मध्ये ग्रामपंचायतीची तरतूद करण्यात आली आहे.
- महाराष्ट्रात **'मुंबई ग्रामपंचयात अधिनियम 1958' उपकलम 5** नुसार ग्रामपंचायतीची निर्मिती झाली आहे.
- स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन होण्यासाठी संबंधीत गावची लोकसंख्या कमीतकमी 600 असली पाहिजे.
- जर एखादया गावाची लोकसंख्या 600 पेक्षा कमी असेल तर दोन किंवा तीन गावे मिळून गट ग्रामपंचायत स्थापन करण्यात येते.
- ग्रामपंचायतीच्या सदस्यांना पंच म्हणतात.
- ग्रामपंचायतीच्या सदस्यांची निवड प्रत्यक्ष प्रौढ मतदान पद्धतीने होते.
- महाराष्ट्रात ग्रामपंचायत सदस्यसंख्या 7 ते 17 अशी आहे.
- ग्रामपंचायतीच्या सदस्यांची संख्या ठरविण्याचा अधिकार (सदस्यसंख्या निश्चित करण्याचा अधिकार) जिल्हाधिकाऱ्यास असतो.

# पंचायतराज व्यवस्था

- लोकसंख्या – पंचाची संख्या
- 600 ते 1500 – 7
- 1501 ते 3000 – 9
- 3001 ते 4500 – 11
- 4501 ते 6000 – 13
- 6001 ते 7500 – 15
- 7501 ते पेक्षा जास्त -17

- ग्रामपंचायतीमध्ये महिलासाठी 50% जागा राखीव असतात.
- ग्रामपंचायतीमध्ये इतर मागासवर्गीयासाठी 27% जागा राखीव असतात.

# पंचायतराज व्यवस्था

- महाराष्ट्रात **1 जून 1959 पासून ‘मुंबई ग्रामपंचायत अधिनियम’** लागू करण्यात आला.
- ग्रामपंचायतीचा अध्यक्ष हा सरपंच असतो.
- सरपंचाची निवड निवडून आलेल्या सदस्यामधून केली जाते तसेच त्यातूनच एकाची उपसरपंच म्हणून निवड केली जाते.
- सरपंच व उपसरपंच निवडीची बैठक तहसीलदार बोलवितो व तोच त्या बैठकीचे अध्यक्षपद भूषवितो.
- ग्रामपंचायतीची निवडणूक लढविण्यासाठी **उमेदवाराचे वय 21 वर्षे** पूर्ण झालेले असावे लागते.
- ग्रामपंचायतीची निवडणूक दर 5 वर्षांनी होते म्हणजेच ग्रामपंचायतीच्या कालावधी 5 वर्षाचा असतो.

# पंचायतराज व्यवस्था

- ग्रामपंचायतीच्या बैठका महिन्यापासून एक म्हणजेच वर्षातून 12 बोलवाव्या लागतात.
- ग्रामपंचायतीच्या पंचास व उपसरपंचास सरपंचाकडे राजीनामा द्यावा लागतो तर सरपंच पंचायत समितीच्या सभापतीकडे राजीनामा देतो.
- सरपंचावर अविश्वासाचा ठराव आणण्यासाठी एकूण सदस्याच्या 1/3 सदस्यांनी लेखी मागणी करावी लागते तर तो ठराव पास होण्यासाठी एकूण सदस्यांच्या 2/3 सदस्यांनी तो ठराव पास करावा लागतो.
- महिला सरपंचावर अविश्वास ठराव पास होण्यासाठी 3/4 बहुमताची आवश्यकता असते.
- एकदा अविश्वास ठराव फेटाळला गेल्यास दुसरा अविश्वास ठराव कमीत कमी 1 वर्षे आणता येत नाही.

# पंचायतराज व्यवस्था

- महाराष्ट्रातील सर्वात मोठी ग्रामपंचायत – अकलूज
- महाराष्ट्रीतील सर्वात जास्त उत्पन्न देणारी ग्रामपंचायत – नवघर
- महाराष्ट्रातील सर्वात जास्त ग्रामपंचायती असणारा जिल्हा – सातारा
- महाराष्ट्रात सर्वात कमी ग्रामपंचायती असणारा जिल्हा – सिंधुदुर्ग
- ग्रामपंचायतीचे वॉर्ड निश्चित करण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यास असतो.

# पंचायतराज व्यवस्था

